आकडेवारी विभाग, पुणे.

डॉ. (श्रीमती) मा.अ.तळवलकर
एम.ए.,पी.एच.डी.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म- मृत्यु
महाराष्ट्र राज्य,

दुरध्वनी क्र. : ६१२७२९२ (वै) ६०५५५३०
फॅक्स क्रमांक : ०२०.- ६१२७२९२
तार : जन्ममृत्यु
निकनेट : jdhivs@mah.nic.in
ई-मेल :sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ. नायडु हॉस्पीटल कंपाऊंड, माहिती
संस्करण केंद्र आवार, पुणे - ४११ ००१.

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/दत्तक बाजन्मनोंद/ 12281-380 /२००१. दिनांक : ५/१०/२००१.

महत्वाचे

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु,
जिल्हा परिषद,.................... (सर्व)

विषय :- दत्तक घेतलेल्या बालकांच्या जन्माची नोंद करणेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.आमाजीआ/कक्ष-८३/दत्तक पुत्र /१०७३३-८०८/९९, दिनांक २ ऑगस्ट,१९९९.

उपरोक्त संदर्भिय पत्रासोबत मा. महानिबंधक, भारत सरकार यांचे दिनांक १४ जुलै, १९९९ च्या इंग्रजी पत्राची प्रत सोबत जोडून आपणांस त्या पत्रातील मसुद्यानुसार कार्यवाही करण्याचे सूचविले होते. या पत्राचे मराठी भाषांन्तर प्राप्त करुन घेऊन यासोबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे. जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु या नात्याने आपण स्वत: व आपले सांख्यिकी अधिकारी तसेच सांख्यिकी अन्वेषक (जिआ) यांनी सखोल अभ्यास करुन आपल्या जिल्हयातील ग्रामीण व शहरी जन्म-मृत्यु निबंधकांच्या शंका दूर करणे गरजेचे आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती तसेच मुख्याधिकारी नगरपरिषद यांचे बैठकीत या विषयावर चर्चा घडवून आणून त्याच्या प्रश्नाना समर्पक उत्तर देऊन दत्तक पुत्राची नोंद दिलेल्या सूचनानुसार होत आहे का? याची खात्री करण्यास सुचवावे.

हे पत्र प्राप्त होताच संबंधीतांना भारत सरकारच्या मराठी पत्राची प्रत त्वरीत पाठविण्याचे सुचवावे व तसे या कार्यालयास कळवावे.

मा.अ.तळवलकर

उपसंचालक आरोग्य सेवा
(आमाजीआ) तथा
उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत - कार्यकारी आरोग्य अधिकारी,
महानगरपालिका मुंबई व
आरोग्य प्रमुख महानगरपालिका,...................... (सर्व)

यांना देवून विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे कार्यक्षेतील सर्व उपनिबंधकांना याबाबत माहिती देवून सूचनांची अमंलबजावणी अपेक्षेप्रमाणे होत आहे का? याची खात्री वेळोवेळी करत जावे.

प्रत सादर -

मा. महासंचालक आरोग्य सेवा
तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

भारत सरकार

गृह मंत्रालय

महानिबंधक कार्यालय, भारत सरकार,

जीवनविषयक आकडेवारी विभाग, पश्चिम गट-१, रामकृष्णपुरम,

नवी दिल्ली

दिनांक : १४ जुलै, १९९९

प्रति,

मुख्य निबंधक जन्म-मृत्यु
संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र
दंत महाविद्यालय इमारत, ४ था मजला,
सेन्ट जॉर्ज हॉस्पिटल कम्पाऊंड,
मुंबई - ४०० ००१.

विषय :- दत्तक घेतलेल्या बालकांच्या जन्माच्या नोंदणीबाबत.

महोदय,

दत्तक घेतलेल्या मूलांची जन्म नोंदणी व दत्तक पालकांच्या नावाने प्रमाणपत्र देण्यासंबंधीची बाब गेल्या काही दिवसांपासून या कार्यालयाच्या विचाराधीन आहे. ही समस्या विविध भागातून मोठया प्रमाणात विचारार्थ पुढे मांडण्यात येत होती. आणि दिवसेंदिवस ती अधिकाधिक व्यापक स्वरुप धारण करु लागली होती. सर्वोच्च न्यायालयाने, १९९० च्या सी.एम.पी.क्रमांक ५७०४ आणि ८८४२ या १९८२ चा रिट विनंती अर्ज क्रमांक ११७१ - एल.के.पांडे विरुध्द भारतीय संघराज्य या खटल्यावरील आपल्या दिनांक १४.८.९१ च्या न्यायनिर्णयात, दत्तक पालकांचे नाव दर्शविणारे दत्तक बालकांच्या जन्माचे प्रमाणपत्र देण्याची गरज स्पष्टपणे मान्य केली होती.

२. वर नमूद केलेल्या रिट विनंती अर्जात १९८४ ते १९८६ या दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार, भारत सरकारने जुलै, १९८९ मध्ये, मुलांच्या दत्तविधानाशी संबंधित प्रमाणके, तत्वे आणि कार्यपध्दती यांची अंमलबजावणी करणे सुकर व्हावे यासाठी, काही विशिष्ट मार्गदर्शक तत्वे ठरवून दिली. १९८९ ते १९९१ या दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने त्याच खटल्यावर दिलेल्या अनेक स्पष्टीकरणात्मक न्यायनिर्णयानंतर, सरकारने पूर्वीच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा करण्यासाठी भूतपूर्व मुख्य न्यायमूर्ती (निवृत्त) श्री.पी.एन्. भगवती यांच्या अध्यक्षतेखाली एका कृती दलाची स्थापना केली. त्या दलाचा अहवाल, ऑगस्ट, १९९३ मध्ये सादर करण्यात आला. शासनाने तो स्वीकारला असून भारतीय मुलांच्या दत्तविधानाची सुधारित मार्गदर्शक तत्वे माहितीसाठी देण्यात आलेली आहेत. त्यात इतर गोष्टींबरोबरच, दत्तक घेतलेल्या मुलांच्या जन्माच्या नोंदणीची आणि त्यांचे जन्म प्रमाणपत्र देण्याच्या विशिष्ट कार्यपध्दतींचा एक संचही समाविष्ट आहे. मार्गदर्शक तत्वांची ठळक वैशिष्टचे पुढील प्रमाणे आहेत, ती अशी :-

एक) संस्थेला (एजन्सीला) स्थानिक दंडाधिका-याकडे एक अर्ज करावा लागेल. आणि त्यासोबत संस्थेत असलेल्या एखाद्या जबाबदार व्यक्तीने केलेल्या शपथपत्राच्या स्वरुपातील कोणतेही अन्य संबंधित कागदपत्रे असतील.

दोन ) दंडाधिका-याने जन्म प्रमाणपत्रात नोंद करावयाच्या तपशीलास मान्यता देणारा आदेश करावयाचा असेल आणि जेथे मूल सापडले होते त्या क्षेत्रातील निबंधकाने तो आदेश काढावयाचा असेल.

तीन) जिल्हयाच्या मुख्य वैद्यकीय अधिका-याची मुलाचे वय निश्चित करण्यासाठी मदत घेतली जाईल आणि त्यांच्याकडून मिळालेल्या प्रमाणपत्रावर दंडाधिकारी, सामान्यपणे कार्यवाही करील.

चार) सामान्यत: दत्तविधानास अंतिम रुप दिलेजाण्यापूर्वी या प्रक्रियेला सुरवात करण्यात यावी, जेणे करुन प्रमाणपत्रात समाविष्ट करण्यासाठी दत्तक पालकांचा तपशील उपलब्ध झालेला असेल.

पाच) जर मूल तीन वर्षाचे झाले असेल आणि दत्तविधानास अंतिम रुप देण्यात आलेले नसेल तर, संस्थेला तशी आवश्यकता आढळून आल्यास, पुढील तपशील समाविष्ट असणा-या शपथपत्राच्या स्वरुपात न्यायालयास कळवून, जन्माचे प्रमाणपत्र मिळवावे लागेल. शपथपत्रातील तपशील पुढीलप्रमाणे -

अ) संस्थेच्या खात्रीलायक माहितीनुसार मुलाचे वय तीन वर्षे आहे,

ब) त्याच्या/ तिच्या दत्तविधानास अंतिम स्वरुप देण्यात आलेले नाही आणि त्याला थोडा वेळ लागणार आहे किंवा कदाचित त्याला अंतिम स्वरुप देता येणार नाही अशीही शक्यता आहे,

क) शैक्षणिक/वैद्यकीय/कायदेविषयक प्रयोजनांसाठी किंवा विनिर्दिष्ट करता येईल अशा कोणत्याही अन्य वाजवी प्रयोजनासाठी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, आणि

ड) एखादी किंवा अनेक व्यक्ती (ही व्यक्ती किंवा या व्यक्ती, मुले दत्तक देणा-या संस्थेची एक जबाबदार व्यक्ती असेल किंवा जबाबदार व्यक्ती असतील) त्या मुलाला/त्या मुलीला सज्ञानवयता प्राप्त होईपर्यत किंवा त्याला/तिला दत्तक घेतले जाईपर्यत - यापैकी जे अगोदर घडेल त्या वेळेपर्यंत,- त्याचे/तिचे स्थानिक पालक म्हणून राहील/राहतील,

सहा) दत्तविधानानंतर मुलाच्या/मुलांच्या नावामध्ये/नावांमध्ये बदल करण्यासाठी, व दत्तक पालक/पालकांचे नाव घालण्यासाठी ज्या न्यायालयाने मूळ जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश संमत केला होता अशा न्यायालयाकडून त्या आशयाचा आदेश मिळाल्यानंतर जन्माबाबतचे दुसरे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

३. वर नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये घालून दिलेली कार्यपध्दती संपूर्णपणे स्वीकारण्याचे ठरविण्यात आले आहे. फक्त मुलाच्या वय निश्चितीच्या संबंधात, ही कार्यपध्दती आणखी विस्तृत असण्याची गरज आहे. जरी मार्गदर्शक तत्वांअन्वये, मुख्य वैद्यकीय अधिका-याला वय निश्चिती करण्यासाठी सहभागी करुन घ्यावयाचे असेल आणि मुख्य वैद्यकीय अधिका-यालाकडून मिळालेल्या प्रमाणपत्रावर दंडाधिका-याने कारवाई करावयाची असली तरीही जन्माची नेमकी तारीख ठरविणे आवश्यक असेल, केवळ पूर्ण

वर्षात किंवा अगदी वर्ष व महिने यात नमूद केलेले वय पूरेसे ठरणार नाही. म्हणून, मुख्य वैद्यकीय अधिका-याकडून प्रमाणपत्र मिळाल्यावर, दंडाधिका-याने मुध्दा प्रमाणपत्रात नोंद करावयाच्या अन्य तपशीलास मान्यता देतांना आणि त्याबाबत आदेश देतांना, मुलाच्या जन्माच्या तारखेबाबत खात्री करुन घ्यावी लागेल.

४. तथापि, उक्त मार्गदर्शक तत्वे, ज्यांना अनाथालये, बाल कल्याण संस्था व इतर तत्सम संस्था यांच्याकडून दत्तविधानासाठी पुरस्कृत करण्यात आले आहे, अशा बालकांनाच केवळ लागू आहेत. हे लक्षात घेतले पाहिजे. या संस्थाकडून करण्यात येणा-या व्यवस्थेव्यतिरिक्त एरव्हीही मोठया प्रमाणावर दत्तविधाने पार पाडली जातात. उदारणार्थ - नातेवाईक किंवा मित्रांकडून दत्तक घेण्यात आलेली बालके अशा बालकांना देखील हे लाभ देण्याचे ठरविण्यात आले आहे. अशा स्वरुपाची औपचारिक दत्तविधाने बहुधा नागरी क्षेत्रात प्रचलित आहेत. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये बहुधा त्या मुलांच्या जन्माची नोंदणी करण्यात आलेली असते आणि जन्म प्रमाणपत्रे दिलेली असतात. अशा प्रकरणांमध्ये, त्या क्षेत्रात अधिकारिता असलेल्या दंडाधिका-याने अशा दत्तक पालकांमध्ये तपशील जन्म नोंदवहीत/ प्रमाणपत्रात नोंद करण्यास / तीमध्ये फेरफार करण्यास मान्यता देणारा आदेश संमत करणे आणि तसेच दुसरे जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश संमत करणे देखील पुरेसे ठरणार आहे. एखाद्या प्रकरणात जन्माची नोंदणी झाली नसेल तर, आदेश संमत करणा-या दंडाधिका-यास जन्माची नेमकी तारीख निश्चित करावी लागेल आणि तो, नैसर्गिक पालकांकडील संबंध्द पुराव्याच्या किंवा प्रतिज्ञापत्राच्या आधारावर आणि त्यांच्या अनुपस्थितीमध्ये मुख्य वैद्यकीय अधिका-याकडून मिळालेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर तसे करु शकेल.

५. निबंधकाला, अन्य न्यायालयीन आदेशाच्या प्रकरणात तो जसे करतो त्याप्रमाणे, दंडाधिका-याने मान्यता दिलेल्या तपशीलानुसार नोंदी करतांना किंवा त्यात दुरुस्ती करतांना, "शेरा" या रकान्यात न्यायालय आदेशाचा (तारखेसह) तपशील देणारी नोंद करावी लागेल.

६. माहिती कळविण्याच्या सामान्य कालावधीनंतर, जर जन्माची नोंद करण्यात येत असेल तर, जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ याच्या कलम १३ अन्वये ठरवून दिलेली सर्व कार्यपध्दती काटेकोरपणे अनुसरावी लागेल.

७. अधिकार श्रेणीनुसार थेट स्थानिक निबंधकाच्या स्तरापर्यंतच्या सर्व नोंदणी अधिका-यांच्या निदर्शनास हे आणून द्यावे. अशी आता आपणांस विनंती करण्यात येत आहे. मुलांच्या दत्तविधानाच्या पुरस्कर्त्या अशा आपल्या राज्यातील सर्व संस्थामध्ये देखील हे परिपत्रक प्रसृत करण्यात यावे. ज्यांना या संबंधात आदेश देता येतील अशा स्थानिक अधिका-यांना योग्य त्या मार्गाने मार्गदर्शक तत्वाखाली निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीबाबतची जाणीव करुन देण्याची देखील खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

यासंबंधात देण्यात आलेल्या सूचनांची एक प्रत, दिनांक ७.८.९९ पर्यंत या कार्यालयाकडे अग्रेषित करण्यात यावी.

आपला विश्वासू

सही/-

(आर.जी.मित्रा)

उप-महानिबंधक.

**भारतीय मुलांच्या दत्तविधानासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांतील संबंधीत उतारा, - १९९५- कल्याण मंत्रालय, भारत सरकार.**

**जन्म प्रमाणपत्र**

४.१८ प्रत्येक मुलाचे जन्म प्रमाणपत्र असलेच पाहिजे. ज्याच्या जन्माची नोंदणी उपलब्ध नाही अशा, सोडून दिलेल्या किंवा निराश्रित मुलाच्या संबंधातील जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी, संबंधित संस्थेला, तिला संबंधित वाटतील अशा कोणत्याही अन्य कागदपत्रांसहित, त्या संस्थेच्या एखाद्या जबाबदार व्यक्तीने केलेल्या शपथपत्राच्या स्वरुपात, स्थानिक दंडाधिका-याकडे एक अर्ज करावा लागेल. त्यानंतर, स्थानिक दंडाधिकारी, जन्म प्रमाणपत्रात नोंद करावयाच्या तपशीलास मान्यता देणारा आदेश संमत करील आणि दंडाधिका-याच्या आदेशाच्या आधारावर, जेथे ते मूल सापडले असेल अशा शहराच्या/नगराच्या/क्षेत्राच्या, जन्म प्रमाणपत्र देणा-या स्थानिक प्राधिका-याकडून आवश्यक ते प्रमाणपत्र देण्यात येईल. जिल्हयाच्या मुख्य वैद्यकीय अधिका-याला वय निश्चितीच्या चौकशीत सहभागी करता येईल. मुख्य वैद्यकीय अधिका-याकडून मिळालेल्या प्रमाणपत्रावर दंडाधिकारी सामान्यपणे कार्यवाही करील. दत्तविधानास अंतिम रुप देण्यात आल्यानंतरच केवळ हया प्रक्रियेस सुरुवात करण्यात येईल. जेणेकरुन प्रमाणपत्रात समाविष्ट करण्यासाठी दत्तक पालकांचा तपशील उपलब्ध झालेला असेल. मूल तीन वर्षाचे झाले असेल आणि तरीही दत्तविधानास अंतिम रुप देण्यात आले नसेल अशा प्रकरणात, संस्थेला, आवश्यक असल्याचे आढळून आल्यास शपथ पत्राच्या स्वरुपात न्यायालयास खालील माहिती कळविल्यानंतर, जन्म प्रमाणपत्र मिळविता येईल :-

अ) मुलाने वयाची तीन वर्षे पूर्ण केली आहेत याबाबत संस्थेला खात्रीलायक माहिती आहे,

ब) त्याच्या/तिच्या दत्तविधानास अंतिम रुप देण्यात आलेले नाही आणि त्याला वेळ लागण्याची शक्यता आहे किंवा बहुतकरुन त्याला कधीही अंतिम रुप देता येणार नाही,

क) शैक्षणिक/ वैद्यकीय/ कायदेविषयक प्रयोजनांसाठी किंवा विनिर्दिष्ट करता येईल अशा कोणत्याही अन्य वाजवी प्रयोजनासाठी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, आणि

ड) एखादी किंवा त्याहून अधिक व्यक्ती (ही व्यक्ती किंवा हया व्यक्ती, मुले दत्तक देणा-या संस्थेची एक जबाबदार व्यक्ती असेल किंवा जबाबदार व्यक्ती असतील) त्या मुलाला/मुलीला सज्ञानव्यता प्राप्त होईपर्यंत किंवा त्याला /तिला दत्तक घेतले जाईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत त्या मुलाचे/ मुलीचे स्थानिक पालक म्हणून राहील/ राहतील.

अशा प्रकरणांमध्ये दत्तविधानानंतर दत्तक पालकाच्या/पालकांच्या आणि मुलाच्या नावामध्ये/नावांमध्ये बदल करण्यासाठी, ज्या न्यायालयाने मूळ जन्म प्रमाणपत्र देण्याबाबतचा आदेश संमत केला होता अशा न्यायालयाकडून त्या आशयाचा आदेश मिळाल्यानंतर दत्तक विधानानंतर दुसरे जन्म प्रमाणपत्र देता येईल.